आपल्या परिसरातील ताज्या घडामोडींसाठी
Deshdoot Media Group
आजच डाऊनलोड करा, देशदूतचे मोबाईल ॲप!
ॲप डाऊनलोड करण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा!

शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

**सूचना**
आजच्या अंकात चांदवड-देवळा विधानसभा मतदारसंघ निवडणुकीतील केंद्रनिहाय उमेदवारास मिळालेली मतांची आकडेवारी वाचा.
पान ४ वर

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | नाशिक | वर्ष ५६ | अंक ८४ | शुक्रवार, दि. २९ नोव्हेंबर २०२४ | पाने १२ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा Android व Apple वर

## संपादकीय

### एकत्र या आणि कृती करा

महिलांवरील हिंसाचार निर्मूलन आंतरराष्ट्रीय पंधरवडा जगभर साजरा होत आहे. महिलांवरील हिंसाचार ही गंभीर आणि सतत चर्चिली जाणारी समस्या आहे. केवळ भारतातच नव्हे तर जगभरातील महिलांना विविध प्रकारच्या हिंसाचाराला सामोरे जावे लागते. मारहाण, ॲसिड हल्ला, हुंडाबळी, सन्मान्य हत्या (ऑनर किलिंग), शारीरिक अत्याचार, बलात्कार, आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात सायबर वर्ल्डची काळी बाजू अशाप्रकारच्या हिंसेचा महिला बळी ठरतात. यामुळे होणारे मानसिक विकार हादेखील त्याच हिंसेचा एक भाग मानला जायला हवा. याबाबतीत सामाजिक पातळीवर जाणिवेचाच अभाव आढळतो. मग मानसिक विकारांचा स्वीकार ही फार दूरची गोष्ट आहे. हिंसाचाराची समस्या संपुष्टात आणण्यासाठी प्रयत्न सुरू असतात. काही सामाजिक संस्था आणि वैयक्तिक पातळी असे त्याचे सामान्य स्वरूप आढळते. तथापि समाजात खोलवर रुजलेली ही समस्या निकाली काढण्यासाठी बहुआयामी प्रयत्न करावे लागतील. प्रयत्नांना व्यापक स्वरूप द्यावे लागेल. अशा हिंसाचाराच्या विरोधात लढण्यासाठी कायदे आहेत, पण ते न्याय मिळवून देण्यास सक्षम असावेत का? अशा प्रकरणांमध्ये तपास आणि न्याय मिळण्यास विलंब आढळतो. निर्दोष व्यक्तीला शिक्षा होऊ नये असे न्यायतत्त्व सांगितले जाते. ते योग्यच, पण विलंब फक्त पीडितांचेच खच्चीकरण करत नाही तर इतरांची न्याय मागण्याची उर्मी दाबून टाकत असू शकेल. काहीही होत नाही, अशी भावना हिंसा सहन करायला भाग पाडत असू शकेल का? जलद न्याय मिळवून देण्यासाठी कायदे सक्षम असायलाच हवेत. ती सरकारची जबाबदारी आहे. अन्याय करणाऱ्याइतकाच तो सहन करणाराही दोषी असतो असे म्हटले जाते. तथापि कोणतीही, विशेषतः घरगुती हिंसा हा अन्याय आहे याची जाणीव महिलांमध्ये अभावानेच आढळते. थोडेफार सहन करावेच लागते, मारणे हा नवऱ्याचा अधिकार आहे अशीच बहुसंख्य महिलांची भावना आढळते. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणात अनेक महिलांनी तसे मान्य केल्याचे वृत्त माध्यमांत प्रसिद्ध झाले होते. एक व्यक्ती म्हणून स्वतः कडे बघण्याची दृष्टी महिलांना शिक्षणामुळे मिळू शकेल. महिला स्वतःकडे व्यक्ती म्हणून बघायला शिकल्या तर त्याचा प्रतिसाद तसाच मिळण्याची शक्यता बळावते, हे महिलांनी लक्षात घ्यायला हवे. अन्यथा दुय्यम स्थानाच्या त्याच इतक्या प्रभावात आढळतात की अन्याय झाल्याचे बहुसंख्यांना जाणवतदेखील नाही किंवा जाणवले तरी त्यांचे मन मानत नाही. ती जाणीव व्यापक पातळीवर रुजायला हवी. आधुनिक तंत्रज्ञान महिलांनी थोडेतरी शिकायला हवे. जेणेकरून सायबर जगताच्या काळ्या बाजूत त्या फसणार नाहीत. महिलांच महिलांवर अन्याय करतात असे समाज मानतो. कौटुंबिक हिंसाचाराच्या बाबतीत तसे आढळतेदेखील. न्यायासाठी महिलांनी महिलांची साथ द्यायला हवी. हिंसाचार रोखण्यासाठी एकत्र यायला हवे. सामूहिक शक्ती कोणा एकीवर होणारा अन्यायदेखील टाळू शकते. यावर्षीच्या हिंसाचार प्रतिबंधक दिवसाची तीच संकल्पना आहे. 'एकत्र या आणि कृती करा' त्यातील गर्भितार्थ महिला लक्षात घेतील का?



पुणे येथे अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेतर्फे महात्मा फुले समता पुरस्कार प्रसिद्ध लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते नागराज मंजुळे यांना छगन भुजबळ यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी आमदार हेमंत रासने, पंकज भुजबळ, समीर भुजबळ, रूपाली चाकणकर आदी उपस्थित होते.
(वृत्त पान १० वर)

# राष्ट्रवादीचे आता दिल्ली लक्ष्य

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी गुरुवारी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील लक्षणीय यशानंतर पक्षाचा राष्ट्रीय स्तरावर विस्तार करण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. राजधानी दिल्लीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या बैठकीत बोलताना पवार यांनी राष्ट्रीयस्तरावर पक्षाला बळकटी देण्याबाबत वक्तव्य केले. याशिवाय त्यांनी ईव्हीएमच्या मुद्यावरून विरोधकांवरही सडकून टीका केली. ते म्हणाले, लोकसभा निवडणुकीचे निकाल त्यांच्या बाजूने आले तेव्हा ईव्हीएम ठीक होते; परंतु विधानसभेतील साफसफाई झाल्यानंतर पुन्हा ईव्हीएम खराब झाले.



अजित पवार म्हणाले, आमचा पक्ष एकेकाळी राष्ट्रीय पक्ष होता. तो दर्जा परत मिळवण्यासाठी आता आपल्याला अधिक कष्ट करण्याची गरज आहे. आम्ही लढू आणि यश मिळवू. यादरम्यान अजित पवार यांनी डिसेंबरनंतर होणाऱ्या राष्ट्रीय परिषदेची योजनाही जाहीर केली. ते म्हणाले, जो निकाल देण्याची ताकद दाखवेल त्याला संधी दिली जाईल. आम्हाला तरुण पिढीला पुढे आणायचे आहे आणि महिलांना पूर्ण संधी मिळतील याची खात्री करायची आहे. महाराष्ट्रात महायुतीला महिलांनी भक्कम पाठिंबा दर्शवला आहे. कोणत्याही आघाडीचे एवढ्या मोठ्या संख्येने आमदार निवडून येण्याची ही पहिलीच निवडणूक आहे. महाराष्ट्र पान १० वर

# सत्तास्थापनेचा राजधानीत खल

## महायुतीच्या नेत्यांचा बैठकांचा सिलसिला

- एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्रिपद स्वीकारणार काय?
- राजकीय वर्तुळात उत्सुकता
- उपमुख्यमंत्रिपदासाठी श्रीकांत शिंदे यांच्या नावाची चर्चा

**नवी दिल्ली/मुंबई । वृत्तसंस्था/प्रतिनिधी**

राज्यात सत्तास्थापनेच्या हालचाली गतिमान झाल्या असून महायुतीमधील शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या प्रमुख नेत्यांसमवेत भारतीय जनता पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांचा रात्री उशिरापर्यंत बैठकांचा सिलसिला सुरू होता. या बैठकांमध्ये मुख्यमंत्रिपदासह मंत्रिमंडळाच्या सूत्रांवर चर्चा करण्यात आल्याचे सूत्रांकडून समजते.

भाजपचे केंद्रातील वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील तो मला मान्य आहे, असे एकनाथ शिंदे यांनी गुरुवारीच जाहीर केले आहे. तर अजित पवारांनीही भाजपला आमचा पाठिंबा असल्याचे स्पष्ट केले. त्यामुळे भाजपचा मुख्यमंत्रिपदाचा मार्ग मोकळा झाला असून आता राजधानी नवी दिल्लीत आज बैठकांना जोर आला होता. महायुतीमधील भाजपचे देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार हे दुपारीच दिल्लीत दाखल झाले. या दोन्ही नेत्यांमध्ये सुनील तटकरे यांच्या निवासस्थानी सुमारे दीड तास चर्चा झाली. यादरम्यानच राज्यातील भाजप नेत्यांसमवेत पक्षाध्यक्ष जे. पी. नड्डा यांचीही बैठक झाली. याचवेळी रात्री नऊ वाजेच्या सुमारास महाराष्ट्राचे काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे राजधानीत दाखल झाले. यावेळी त्यांनी पत्रकारांशी बोलताना सत्तास्थापनेत आपला कोणताही अडसर नसल्याचा पुनरुच्चार केला. त्यानंतर ते भाजपचे वरिष्ठ नेते अमित शहा यांच्या निवासस्थानी दाखल झाले. त्यानंतर फडणवीस आणि पवार हे दाखल झाले. त्यानंतर या महाबैठकीला प्रारंभ झाला.

दरम्यान, शिवसेना शिंदे गटाचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी महायुतीच्या मुख्यमंत्रिपदावरील दावा सोडल्यानंतर त्यांच्या पक्षाच्या वाट्याला उपमुख्यमंत्रिपद येणार असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे गेली अडीच वर्षे राज्याचे यशस्वी मुख्यमंत्री ठरलेले एकनाथ शिंदे भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये उपमुख्यमंत्रिपद स्वीकारणार काय? याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. दरम्यान, एकनाथ शिंदे हे महायुतीचे समन्वयक म्हणून काम पाहतील आणि उपमुख्यमंत्रिपद खासदार श्रीकांत शिंदे यांच्याकडे सोपवले जाईल, अशी शक्यता वर्तवली जात आहे.

### २ डिसेंबरला नव्या सरकारचा शपथविधी?

येत्या २ डिसेंबरला महायुतीच्या नव्या सरकारचा शपथविधी पार पडण्याची शक्यता आहे. परंतु संभाव्य मंत्रिमंडळात अनेक दिग्गज नेत्यांना पत्ता कट होण्याचीही शक्यता वर्तवली जात आहे. ज्येष्ठ नेत्यांऐवजी तरुण चेहऱ्यांना संधी देण्याबाबत गांभीर्याने विचार सुरू असल्याचे कळते. मुख्यमंत्रिपदासोबत गृहमंत्रालय देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच कायम राहण्याची शक्यता आहे. तर गिरीश महाजन, सुधीर मुनगंटीवार, चंद्रकांतदादा पाटील, डॉ. विजयकुमार गावित यांच्यासारख्या बड्या नेत्यांबाबत 'वेट ॲण्ड वॉच'ची भूमिका घेतली जाऊ शकते. मात्र याबाबत भाजपकडून कोणतेही अधिकृत भाष्य करण्यात आले नाही.

# नवाब मलिक यांच्या अडचणीत वाढ

## ॲट्रॉसिटी गुन्ह्याचा तपास स्वतंत्र यंत्रणेद्वारे करा

- वानखेडे यांच्या याचिकेची हायकोर्टाकडून दखल
- राज्य सरकारला नोटीस
- सुनावणी १२ डिसेंबरला

**मुंबई । प्रतिनिधी**



माजी मंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. त्यांच्याविरोधात २०२२ मध्ये दाखल केलेल्या ॲट्रॉसिटीच्या गुन्ह्याचा स्वतंत्र यंत्रणेद्वारे तपास करण्याचा आदेश द्या अशी मागणी करणारे केंद्रीय महसूल अधिकारी समीर वानखेडे यांच्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. न्यायमूर्ती रेवती मोहिते डेरे आणि न्यायमूर्ती पृथ्वीराज चव्हाण यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला नोटीस बजावत याचिकेची सुनावणी १२ डिसेंबरला निश्चित केली.

केंद्रीय महसूल अधिकारी समीर वानखेडे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते नवाब मलिक यांच्याविरोधात २०२२ मध्ये अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. मात्र गेल्या दोन वर्षांत गोरेगाव पोलिसांना अनेकदा स्मरणपत्रे देऊनही मलिक यांच्याविरोधातील ॲट्रॉसिटी गुन्ह्यात गंभीर तरतुदींचा समावेश करण्यात आलेला नाही. मलिक हे राजकीय ताकद, प्रभाव आणि पैशांच्या सामर्थ्यावर पोलीस कारवाईपासून स्वत:चा बचाव करत आहेत आणि विविध माध्यमांना उघडपणे मुलाखती देत आहेत. मलिक यांना कोणताही अंतरिम दिलासा नसतानाही ते मुक्तपणे विधानसभा पान १० वर

# आणखी एक गांधी संसदेत

## प्रियंकांची संविधानाची प्रत घेऊन खासदारकीची शपथ

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

केरळच्या वायनाडमधून लोकसभा पोटनिवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेसच्या प्रियंका गांधी-वाड्रा यांनी आज खासदार म्हणून शपथ घेतली. शपथ घेताना त्यांनी संविधानाची प्रत हातात घेतली होती.

प्रियंका गांधी जेव्हा पद आणि गोपनीयतेची शपथ घेत होत्या तेव्हा त्यांचे भाऊ राहुल आणि आई सोनियादेखील खासदार म्हणून तिथे उपस्थित होते. शपथ घेतल्यानंतर प्रियंका त्या नेत्यांच्या यादीत सामील झाल्या, ज्यांच्या कुटुंबातील एक किंवा दुसरा सदस्य संसदेच्या कोणत्याही सभागृहाचा सदस्य आहे. याशिवाय आजपासून सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी हे तिघेही खासदार म्हणून संसदेत उपस्थित राहणार असल्याची एक वैशिष्ट्यपूर्ण बाबही



दिसून आली. सोनिया राज्यसभेच्या सदस्य आहेत तर राहुल आणि प्रियंका लोकसभेचे सदस्य आहेत. प्रियंका लोकसभेत नेहरू-गांधी कुटुंबातील १६ व्या सदस्य आहेत.

वायनाडमधून जिंकलेल्या राहुल गांधी यांनी राजीनामा दिल्याने येथे पोटनिवडणूक घेण्यात आली होती. या पोटनिवडणुकीत प्रियंका यांनी मोठ्या मताधिक्क्याने विजय मिळवला होता.

### चव्हाण यांची मराठीतून शपथ

रवींद्र चव्हाण यांनी आज लोकसभेत मराठीतून खासदारकीची शपथ घेतली. वसंत चव्हाण यांच्या निधनानंतर नांदेडमध्ये पोटनिवडणूक झाली. काँग्रेसकडून रवींद्र चव्हाण यांना उमेदवारी देण्यात आली होती. अखेरच्या फेऱ्यांमध्ये त्यांचा विजय झाला आहे. सुरुवातीच्या अनेक फेऱ्यांमध्ये ते पिछाडीवर होते.



